नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 20/07/2023 (गुरूवार) सकाळ

## मंदीरात चोरी करणारे आरोपी जेरबंद
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कारवाई

दिनांक १४/०७/२०२३ चे १५.३० वा. ते १६.०० रोजी कोणीतरी अज्ञात चोरांनी सिध्दीविनायक गणेश मंदिर रामटेक येथील दानपेटीतील नगदी रोख व लाउडस्पिकर मशिन असा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरांनी चोरून नेले. अशा फिर्यादी नामे– धर्मराज कवडुजी राहटे वय ४२ वर्ष रा. वार्ड नं. २ रेल्वे स्टेशन जवळ शितलवाडी रामटेक यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. रामटेक अप. क्र. ४६६/२३ कलम ३७९ भा.द.वी. अन्वये गुन्हा नोंद झाला होता.

सदर गुन्हयाचा समांतर तपासात मा. पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेतील पथक पोलीस स्टेशन रामटेक हद्दीत गस्त करीत असतांना दि. १९/०७/२०२३ रोजी पो.स्टे. रामटेक अप. क्र. ४६६/२३ कलम ३७९ भा.द.वी. चे गुन्ह्यात आरोपी यांचा शोध घेत असता गुप्त बातमीदारां कडून माहिती मिळाली की सदर गुन्ह्यात भोजापूर गावातील आरोपी नामे– **१) लोमेश प्रभाकर चांदेकर वय २८ वर्ष** यांनी केल्याचे माहिती वरून त्यास ताब्यात घेऊन त्याला सदर गुन्हयाबाबत विचापुस केली असता सदर गुन्हा **२) दिलीप चंद्रभान येवले वय ३१ वर्ष रा. दोन्ही रा. भोजापूर ता. रामटेक** याचा सोबत केल्याची कबूली दिली. सदर गुन्हयात वापरलेली मोटरसायकल ही पोलीस स्टेशन रामटेक येथील अप. क्र. ४६६/२३ कलम ३७९ भा.द.वी. चे गुन्ह्यातील असल्याचे निष्पन्न झाले. सदर आरोपीतांच्या ताब्यातून १) लाऊडस्पीकर मशीन किंमती अंदाजे ७,०००/– रु. २) नगदी ९००/– रु. ३) हिरो होंडा कंपनीची सुपर स्प्लेंडर क्र. MH–४०– H– ९०८५ किंमती अंदाजे ३०,०००/– रूपयाचा असा एकूण ३७,९००/– रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमूद आरोपीतांची मेडिकल तपासणी करुन मुद्देमाल व आरोपींसह पूढील तपास कामी पो.स्टे. रामटेक यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नागपूर (ग्रामीण) श्री. विशाल आनंद (भा.पो.से.) तसेच अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले साहेब यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे सह सहायक पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, पोलीस हवालदार गजेंद्र चोधरी, रोशन काळे, पोलीस नायक प्रमोद भोयर, नितेश पिपरोदे, विपीन गायधने चालक पोलीस हवालदार अमोल कुथे यांनी पार पाडली.




## जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. कुही :– फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे अप क्र. ५२/१९ कलम ३७६ (३), ३७६ (२) (जे) भादवि. सहकलम ३, ४ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयात यातील फिर्यादी व आरोपी नामे– रामदास मारोती ठाकरे, वय ५९ वर्ष रा. डोंगरगाव हे एकाच गावात राहत असुन फिर्यादीची अल्पवयीन पिडीत मुलगी ही गावातील नहरावरून कपडे धुवुन घरी परत येत असताना आरोपीने फिर्यादीच्या पिडीत मुलीला एकटी पाहुन तिचा हात पकडुन शेतातील झुडुपात ओढत नेले व पिडीतेशी आरोपीने जबरी संभोग केला व जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणाचे तपास पोलीस निरीक्षक जगदीश गायकवाड यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक २०/०७/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश एक्स्ट्रा. डी. जे– त्रिवेदी सा.े. न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३७६(३) मध्ये २० वर्ष सश्रम कारावास व १०,०००/रू दंड ,दंड न भरल्यास ०२ महिने सश्रम कारावास तसेच कलम ५०६ (२) भादंवि मध्ये ०५ वर्ष सश्रम कारावास व २०००/–रू दंड, दंड न भरल्यास १५ दिवस सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी राउत मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी कर्मचारी म्हणुन पोलीस हवालदार दिलीप लांजेवार पो.स्टे. कुही यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर